सामाजिक न्याय विभागाच्या विशेष घटक कार्यक्रमांतर्गत अनुसूचित जातीच्या कृषीपंप ग्राहक लाभार्थ्यांना वीज दरात सवलतीसाठी सन २०२६-२७ मध्ये रु.१६४.०८ कोटी अनुदान वितरित करणेबाबत मागणी क्र.एन-३ (मुख्यलेखाशिर्ष २८०१५६६१).

महाराष्ट्र शासन
उद्योग, ऊर्जा, कामगार व खनिकर्म विभाग,
शासन निर्णय क्र.निधीवि-२०२६/प्र.क्र.६४/ऊर्जा-३,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक :- २९ जुलै,२०२६.

संदर्भ:- १. वित्त विभाग,शासन परिपत्रक क्र. अर्थसं-२०२६/प्र.क्र.४०/अर्थ-३,दि.०९/०४/२०२६
२. महावितरण कंपनीचे पत्र क्र.पी.कॉम /शासन/मागणी/सवलत/२६-२७/Q-१/ SCP १६३३९,दि.१५.०५.२०२६.
३. सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग,शासन निर्णय क्र.बीजीटी-२०२६/प्र.क्र.१०५/अर्थसंकल्प (विघयो), दि.०७/०७/२०२६.

प्रस्तावना :-

राज्यातील कृषीपंपधारकांना दरवर्षी सवलतीच्या दरात वीज पुरवठा करण्यात येतो व त्याची प्रतिपूर्ती करण्यासाठी महावितरण कंपनीस अर्थसहाय्य देण्यात येते. सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाच्या अनुसूचित जाती विशेष घटक कार्यक्रमांतर्गत अनुसूचित जाती घटकाच्या वैयक्तिक लाभार्थी कृषीपंपधारकांना वीज दरात सवलत देण्यासाठी सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाने सन २०२६-२७ करिता महावितरण कंपनीस अर्थसहाय्य उपलब्ध करून देण्यासाठी रु.६७८.०० कोटी इतकी अर्थसंकल्पिय तरतुद केली आहे.

२. वित्त विभागाच्या संदर्भ क्र.१ वरील शासन परिपत्रकातील सुचनांच्या अनुषंगाने व वित्त विभागाने अनुमती दिल्यानुसार सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाने रु. १६४.०८ कोटी इतकी तरतूद संदर्भिय शासन निर्णय क्र. ३ अन्वये महावितरण कंपनीस वितरित करण्यासाठी प्रशासकीय विभाग म्हणून ऊर्जा विभागास उपलब्ध करुन दिली आहे.सदर तरतूद **रु.१६४,०८,००,०००/-(रुपये एकशे चौसष्ट कोटी आठ लाख फक्त)** महावितरण कंपनीस वितरित करण्याची बाब शासनाच्या विचारधीन होती.

शासन निर्णय :-

महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित यांना सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाच्या अनुसूचित जाती विशेष घटक कार्यक्रमांतर्गत अनुसूचित जाती घटकाच्या वैयक्तिक लाभार्थी कृषीपंपधारकांना वीज दरात सवलत देण्यासाठी **रु.१६४,०८,००,०००/-(रुपये एकशे चौसष्ट कोटी आठ लाख फक्त)** महावितरण कंपनीस रोखीने वितरित करण्यास शासन मंजुरी देण्यात येत आहे.

२. वरील बाबींचा खर्च "मागणी क्र. एन-३, २८०१ वीज, उप मुख्यलेखाशिर्ष ०५ पारेषण व वितरण,गौणशिर्ष ७८९ अनुसूचित जातीसाठी विशेष घटक योजना, गट शिर्ष (०१) अनुसूचित जाती घटक कार्यक्रमांतर्गत योजना,उपगट शिर्ष (०१)(०२) कृषीपंप ग्राहकांना वीज दरात सवलत (कार्यक्रम) योजना सांकेतांक (२८०१५६६१) ३३, अर्थसहाय्य या लेखाशिर्षाखाली सन २०२६-२७ करिता मंजूर अनुदानातून खर्ची टाकण्यात यावा.

३. सदर शासन निर्णयान्वये मंजूर करण्यात आलेल्या अर्थसहाय्याची रक्कम फक्त अनुसूचित जाती घटकांतर्गत लाभार्थ्यांवरच वीज दरात सवलतीपोटी खर्च होईल याची दक्षता महावितरण कंपनीने घ्यावी. तसेच ज्या उद्देशासाठी सदर निधी मंजूर करण्यात आला आहे, त्याच उद्देशासाठी तो उपयोगात आणला जाईल याची जबाबदारी महावितरण कंपनीची राहील.

४. सदर रक्कम अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई यांच्यामार्फत कोषागारातून काढून महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,मुंबई यांना अदा करण्यासाठी आहरण व संवितरण अधिकारी म्हणून श्रीम. अंकिता बो-हाडे, कार्यासन अधिकारी(ऊर्जा-३) आणि नियंत्रण अधिकारी म्हणून श्री. नारायण.श्री.कराड, सह सचिव (ऊर्जा-३),उद्योग,ऊर्जा व कामगार विभाग,मंत्रालय,मुंबई यांना प्राधिकृत करण्यात येत आहे. त्यांनी सदर मंजूर झालेली रक्कम **रु. १६४,०८,००,०००/-(रुपये एकशे चौसष्ट कोटी आठ लाख फक्त)** अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई येथून आहरित करुन आहरण व संवितरण अधिकारी यांचे मार्फ़त महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित यांचे नावे स्वतंत्ररीत्या धनादेश काढून वितरित अथवा NEFT/RTGS Fund Transfer द्वारे निधी हस्तांतरित करण्याची कार्यवाही करावी.

५. या लेखाशिर्षांतर्गत एक वर्षापुर्वीचे संक्षिप्त देयक प्रलंबित नाही तसेच उपयोगिता प्रमाणपत्र प्रलंबित नाही. सदर देयक हे बिनशर्त असून,वित्त विभाग परिपत्रक क्र. अर्थसं-२०२६/प्र.क्र.४०/अर्थ-३, दि.०९/०४/२०२६ च्या परिपत्रकातील सोबतच्या परिशिष्टातील अटीची पूर्तता होत असल्याचे प्रमाणित करण्यात येत आहे.

६. सदर योजनेला उद्योग, ऊर्जा, कामगार व खनिकर्म विभाग, शासन निर्णय क्र. संकीर्ण-२०२४/ प्र.क्र.९४/ ऊर्जा-३, दि.१३.१२.२०२४ नुसार "आभासी वैयक्तिक ठेव लेखा (VPDA)" या व्यवस्था व कार्यपद्धतीतून सूट देण्यात आली आहे.

७. सदर शासन निर्णय सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाच्या दिनांक ०७/०७/२०२६ च्या शासन निर्णयानुसार व वित्त विभाग अनौपचारिक संदर्भ क्र.८८०/व्यय-१४, दि.३०.०६.२०२६ अन्वये प्राप्त मान्यतेनुसार सदर निधी वितरित करण्यात येत आहे.

८. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा सांकेतांक क्र.२०२६०७२९१२४५४७४१५३ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकीत करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

NARAYAN
SHRIKRISHNA KARAD

Digitally signed by NARAYAN SHRIKRISHNA KARAD
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=INDUSTRIES ENERGY LABOUR AND MINING DEPARTMENT, 2.5.4.20=fc35aa8ffade5bb6105200693c60a32b755f7e67f72965b8dd57adaa570981f1, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=AE7FAEABAF4571C2748E4DD5FFD2CD108DE0E130859970F4D7D0EE40046B3E9E, cn=NARAYAN SHRIKRISHNA KARAD
Date: 2026.07.29 12:46:50 +05'30'

(नारायण श्री. कराड)
सह सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत :

१. मा.राज्यपाल, महाराष्ट्र राज्य, यांचे प्रधान सचिव,राजभवन,मलबार हिल,मुंबई.
२. मा. अध्यक्ष/ उपाध्यक्ष विधानसभा, सभापती/ उपसभापती विधानपरिषद, यांचे सचिव
३. मा. मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव मंत्रालय, मुंबई-३२.
४. मा. उपमुख्यमंत्री (नगरविकास व गृहनिर्माण), यांचे प्रधान सचिव मंत्रालय, मुंबई-३२.
५. मा.उपमुख्यमंत्री (राज्य उत्पादन शुल्क, क्रीडा व युवक कल्याण, अल्पसंख्याक विकास व औकाफ) यांचे प्रधान सचिव मंत्रालय, मुंबई-३२.

६. मा. मंत्री अपारंपारिक ऊर्जा, यांचे खासगी सचिव मंत्रालय, मुंबई-३२.
७. मा.राज्यमंत्री ऊर्जा, यांचे खासगी सचिव मंत्रालय, मुंबई-३२.
८. सर्व मा. मंत्री/ राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव मंत्रालय, मुंबई-३२.
९. सर्व विधानसभा/ विधानसभा सदस्य.
१०. मा. मुख्य सचिव, मंत्रालय,मुंबई-३२
११. अपर मुख्य सचिव, (वित्त) मंत्रालय, मुंबई-३२.
१२. सचिव (नियोजन) मंत्रालय, मुंबई
१३. अपर मुख्य सचिव, (ऊर्जा) उद्योग,ऊर्जा,कामगार व खनिकर्म विभाग, मंत्रालय,मुंबई-३२.
१४. अपर मुख्य सचिव/ प्रधान सचिव/ सचिव,सर्व मंत्रालयीन विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.
१५. व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ सुत्रधारी कंपनी, फोर्ट, मुंबई-३२.
१६. अध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनी, प्रकाशगड, बांद्रा (पूर्व), मुंबई-५१
१७. महालेखापाल (लेखापरिक्षा/लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र-१, मुंबई-४०००२०.
१८. महालेखापाल (लेखापरिक्षा/लेखा व परिक्षा), महाराष्ट्र-१, मुंबई-४०००२०.
१९. महालेखापाल (लेखापरिक्षा/लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र-२, नागपूर.
२०. अधिदान व लेखा अधिकारी (अराप/रालेवि-१), मुंबई.
२१. अधिदान व लेखा अधिकारी,अधिदान व लेखा कार्यालय, मुंबई.
२२. सह सचिव, (अर्थसंकल्प/ व्यय -१४), वित्त विभाग , मंत्रालय, मुंबई-३२.
२३. निवडनस्ती (ऊर्जा-३), उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.